# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई, यांच्या आस्थापनेवरील कार्यकारी संचालक, संचालक (प्रशासन आणि वित्त), संचालक (विद्युत अभियांत्रिकी), संचालक (वीज दर), उप संचालक (प्रशासन आणि वित्त), उप संचालक (तांत्रिक) आणि उप संचालक (विधी) ही पदे सरळ सेवा प्रवेशाने/प्रतिनियुक्तीच्या तत्वावर भरण्यासाठी सविस्तर जाहिरात:-**

**१. प्रस्तावना**

विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८, या केंद्रीय कायद्याखाली महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) ची स्थापना ५ ऑगस्ट, १९९९ रोजी झाली. या अधिनियमाला विद्युत अधिनियम, २००३ (वि.अ. २००३) ने अधिक्रमित केले आहे. आयोगा तर्फे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ अंतर्गत विविध कार्ये जशी, वीजनिर्मितीसाठी, पारेषणासाठी आणि विजेच्या वहनासाठी वीज दर निश्चित करणे; महाराष्ट्र राज्यात विजेच्या घाऊक किंवा किरकोळ पुरवठ्यासाठी, जसे असेल तसे, वीज दर निश्चित करणे; वितरण परवानाधारकांची विजेची खरेदी आणि ती प्राप्त करुन घेण्याच्या प्रक्रियेचे नियमन करणे; विजेचे पारेषण, वितरण आणि व्यापार यासाठी परवाना मंजूर करणे आणि नूतनशील ऊर्जा स्रोतांद्वारे वीजनिर्मिती/सहनिर्मितीस चालना देणे, पार पाडण्यात येतात.

**२. आयोगाच्या कार्यांची पार्श्वभूमी**

विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत वीज निर्मितीसाठी परवान्याची गरज आता राहिलेली नाही. तथापि, पारेषण आणि वितरण कंपन्यांना मात्र त्यांच्या कार्यासाठी आयोगाकडून परवाना घ्यावा लागतो. भारत सरकारने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार बोली प्रक्रियेच्या माध्यमातून निश्चित करण्यात आलेले वीज दर स्वीकारणे, राज्यातील वीज ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी विजेची निर्मिती, पारेषण आणि वितरण करण्याच्या कार्यांत गुंतेलेल्या विद्युत कंपन्यांकरिता बहुवर्षीय वीज दर निश्चित करणे, एकूण महसुली गरजेचा आढावा घेणे व मंजूर करणे, वार्षिक कामगिरीचा आढावा घेणे आणि त्यांच्या एकूण महसुली गरजेचे अचूक समायोजन करणे या बाबींचा इतर अन्य बाबींबरोबरच आयोगाच्या कार्यांमध्ये सहभाग होतो. या विद्युत कंपन्यांमध्ये महानिर्मिती कंपनी/महापारेषण कंपनी/महावितरण कंपनी/बेस्ट/दि टाटा पॉवर कंपनी लि.(टीपीसी)/रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (आरइन्फ्रा), जेएसडब्ल्यु

एनर्जी रत्नागिरी लि. (जेएसडब्ल्यु इआरएल), वर्धा पॉवर कंपनी लि. (डब्ल्युपीसीएल), अमरावती पॉवर कंपनी लि. (एपीसीएल), जीएमआर पॉवर लि. आणि नूतनशील आणि पारंपारिक ऊर्जा क्षेत्रातील अनेक कंपन्यांचा समावेश होतो. आयोगातर्फे विद्युत कंपन्या आणि ग्राहक यांच्यातील वादांचे निराकरण ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपालामार्फत करण्यात येते. आयोगाकडून विजेच्या संबंधित विविध प्रश्नांबाबत राज्यशासनाला वेळोवेळी सल्ला देण्यात येतो. आयोगाकडे विद्युत कंपन्या/ग्राहक आणि अन्य विविध हितसंबंधितांनी दाखल केलेल्या याचिकांवर आयोगाकडून विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत विहित करण्यात आलेल्या उचित नियामक प्रक्रियेचे आणि आयोगाने केलेल्या संबंधित विनियमांचे पालन करुन आदेश पारित करण्यात येतात.

आयोगाने आपल्या आस्थापनेवरील कार्यकारी संचालक, संचालक (प्रशासन आणि वित्त), संचालक (विद्युत अभियांत्रिकी), संचालक (वीज दर), उप संचालक (प्रशासन आणि वित्त), उप संचालक (तांत्रिक) आणि उप संचालक (विधी) ही नव्याने निर्माण करण्यात आलेली पदे सरळ सेवा प्रवेशाने/ प्रतिनियुक्तीच्या तत्वावर भरण्याचे ठरविले आहे. या पदांच्या संबंधी पात्रता निकष आणि इतर अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

**पात्रता निकष आणि इतर अटी व शर्ती**

१) **पदाचे नाव:- कार्यकारी संचालक**

**मंजूर पद:- १ (एक) (अराखीव)**

**वेतनश्रेणी:-** रू.३७,४००-६७,०००, ग्रेड पे - रू.१०,०००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील.

(एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.९७,८३०/-)

प्रतिनियुक्तीच्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे शेवटचे वेतन संरक्षित केले जाईल. याशिवाय, त्यांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) विद्युत अभियांत्रिकी/ विद्युत यंत्रणामधील (पॉवर सिस्टीम) पदव्युत्तर पदवी.

किंवा

(ब) एआयसीटीईने मान्यता दिलेल्या विद्यापीठ/संस्थेमधून वित्तीय व्यवस्थापन / वीज व्यवस्थापन मधील २ वर्षाचा एमबीए यासह विद्युत अभियांत्रिकी मधील पदवी किंवा अर्थशास्त्र/वित्तीय व्यवस्थापन/विद्युत यंत्रणामधील (पॉवर सिस्टीम) डॉक्टरेट.

(क) अर्थशास्त्र/वित्तीय व्यवस्थापन/विद्युत यंत्रणा मधील डॉक्टरेट असणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.

**अनुभव:-**

(अ) विद्युत क्षेत्र / विद्युत कंपनी / परवानाधारक यामधील किमान १५ वर्षांचा अनुभव;

(ब) इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;

(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक;

(ड) निर्मिती, पारेषण आणि वितरण प्रणाली व नियोजन, वीज दर निश्चितीकरण, आर्थिक विश्लेषण, प्रतिकृती (मॉडेलिंग) आणि सांख्यिकी तंत्र या कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल.

**वयोमर्यादा (१५.०६.२०११ रोजी):-**

उमेदवाराचे कमाल वय ५० वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही.

**२) पदाचे नाव:- संचालक (प्रशासन आणि वित्त)**

**मंजूर पद:- १ (एक) (अराखीव)**

**वेतनश्रेणी:-** रू.३७,४००-६७,०००, ग्रेड पे - रू.८,९००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील.

(एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.९०,७७१/-)

प्रतिनियुक्तीच्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे शेवटचे वेतन संरक्षित केले जाईल. याशिवाय, त्यांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी.

किंवा

(ब) सीए/ आयसीडब्ल्युए/ चार्टड फायनान्सिअल ॲनालिस्ट (सीएफए)/ किंवा एआयसीटीई मान्यताप्राप्त विद्यापीठ/ संस्थेचा (वित्त / मानव संसाधन (मनुष्यबळ) विषयातील दोन वर्षाचा एमबीए.

**अनुभव:-**

(अ) केंद्र/राज्य शासकीय विभाग, उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यामधील वित्त/ मनुष्यबळ विकास विभागातील १० वर्षांचा अनुभव आवश्यक;

(ब) उत्कृष्ट इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;

(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.

**वयोमर्यादा (१५.०६.२०११ रोजी):-**

उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षाहून अधिक नसावी. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही.

**३) पदाचे नाव:- संचालक (विद्युत अभियांत्रिकी)**

**मंजूर पद:- १ (एक) ( अनुसूचित जातीसाठी राखीव)**

**वेतनश्रेणी:-** रू.३७,४००-६७,०००, ग्रेड पे - रू.८,९००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील.

(एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.९०,७७१/-)

प्रतिनियुक्तीच्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे शेवटचे वेतन संरक्षित केले जाईल. याशिवाय, त्यांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**शैक्षणिक अर्हता:-**

विद्युत अभियांत्रिकी/विद्युत यंत्रणा मधील (पॉवर सिस्टीम) पदव्युत्तर पदवी.

**अनुभव:-**

(अ) नियामक आयोग/विद्युत क्षेत्र/ विद्युत कंपनी/परवानाधारक यामधील किमान १० वर्षांचा अनुभव.

(ब) इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.

(ड) निर्मिती, पारेषण, वितरण, नूतनशील ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता यामध्ये अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल.

**वयोमर्यादा (१५.०६.२०११ रोजी):-**

उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही.

४) **पदाचे नाव:- संचालक (वीज दर)**

**मंजूर पद:- १ (एक) ( अनुसूचित जातीसाठी राखीव)**

**वेतनश्रेणी:-** रू.३७,४००-६७,०००, ग्रेड पे - रू.८,९००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील.

(एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.९०,७७१/-)

प्रतिनियुक्तीच्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे शेवटचे वेतन संरक्षित केले जाईल. याशिवाय, त्यांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) विद्युत/पॉवर अभियांत्रिकीमधील पदवीबरोबरच एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेतून वित्तीय व्यवस्थापन/वीज व्यवस्थापनामधील दोन वर्षांचा एमबीए किंवा सनदी लेखापाल.

किंवा

(ब) अर्थशास्त्र / वाणिज्य / सांख्यिकी विषयात मास्टर डिग्री किंवा अर्थशास्त्र/वित्तीय व्यवस्थापनामध्ये डॉक्टरेट.

किंवा

(क) मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीसह एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधील एमबीए किंवा सनदी लेखापाल.

(ड) अर्थशास्त्र / वित्तीय व्यवस्थापन विषयात डॉक्टरेट मिळविणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.

**अनुभव:-**

(अ) वीज दर निश्चितीकरण प्रक्रियेचा ५ ते ७ वर्षांचा किमान अनुभव;

(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;

(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक;

(ड) निर्मिती, पारेषण, वितरण, नूतनशील ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता आणि वीज व्यापार, अणि आर्थिक विश्लेषण करण्याची योग्यता, प्रतिकृती (मॉडेलिंग) आणि सांख्यिकी तंत्र या कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल.

**वयोमर्यादा (१५.०६.२०११ रोजी):-**

उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही.

**५) पदाचे नाव:- संचालक (विधी)**

**मंजूर पद:- १ (एक) ( अराखीव)**

**वेतनश्रेणी:-** रू.३७,४००-६७,०००, ग्रेड पे - रू.८,९००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील.

(एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.९०,७७१/-)

प्रतिनियुक्तीच्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे शेवटचे वेतन संरक्षित केले जाईल. याशिवाय, त्यांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**शैक्षणिक अर्हता:-**

मान्यताप्राप्त विद्यापीठ / विधी शाळा (लॉ स्कुल) मधील कायदेविषयक पदव्युत्तर पदवी.

**अनुभव:-**

(अ) पदवी प्राप्त केल्यानंतर, कोणत्याही सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील संस्था किंवा सार्वजनिक प्राधिकरण यांच्या विधीविषयक बाबी हाताळताना, न्यायिक/अर्ध-न्यायिक संस्थासारख्या विविध न्यायालयात प्रतिनिधीत्व करण्याचा, किमान १० वर्षांचा वकिलीचा अनुभव. उमेदवारास ॲडव्होकेट्स अधिनियम, १९६१ मधील व्याख्येनुसार एक ॲडव्होकेट म्हणून न्यायालय/न्यायाधीकरण/मंच, इ. मध्ये वकिली करण्याचा किमान ४ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.

(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

(क) संगणकविषयक ज्ञान आवश्यक.

(ड) विद्युत क्षेत्र/नियामक आयोगामध्ये किमान ३ वर्ष कामाचा अनुभव असल्यास अधिक पसंती.

**वयोमर्यादा (१५.०६.२०११ रोजी):-**

उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही.

६) **पदाचे नाव:-** **उप संचालक (प्रशासन आणि वित्त)**

**मंजूर पद:-** **४ (चार) ( २ अराखीव, १ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती)**

**वेतनश्रेणी:-** रू.१५,६००-३९,१००, ग्रेड पे - रू.७,६००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील.

(एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.५५,२९५/-)

प्रतिनियुक्तीच्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे शेवटचे वेतन संरक्षित केले जाईल. याशिवाय, त्यांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**शैक्षणिक अर्हता:-**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.

किंवा

सीए/ आयसीडब्ल्युए/ चार्टड फायनान्सिअल ॲनालिस्ट (सीएफए) किंवा एआयसीटीई मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेचा [(वित्त / मानव संसाधन (मनुष्यबळ)] विषयातील दोन वर्षाचा एमबीए.

**अनुभव:-**

(अ) केंद्र/राज्य शासकीय विभाग, उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग, वित्त संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी किंवा प्रख्यात हार्डवेअर कंपन्यांमधील वित्त किंवा मानव संसाधन विकास किंवा संगणक अभियांत्रिकी कामाचा ७ वर्षांचा अनुभव आवश्यक.

(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.

**वयोमर्यादा (१५.०६.२०११ रोजी):-**

उमेदवाराचे कमाल वय ४० वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही.

**७) पदाचे नाव:- उप संचालक (तांत्रिक)**

**मंजूर पद:- ८ (आठ) ( ४ अराखीव (१ महिला),**
**१ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती, १ विमुक्त जाती (अ) / भटक्या जमाती (ब) / भटक्या जमाती (क) / भटक्या जमाती (ड), १ इतर मागास वर्गीय )**

टिप - उप संचालक (तांत्रिक) च्या ४ अराखीव पदापैकी १ पद महिलांसाठी राखीव राहील.

- उप संचालक (तांत्रिक) च्या ४ राखीव पदापैकी १ पद विजा (अ) साठी राखीव राहील. तथापि, विजा (अ) या प्रवर्गातील सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, भज (ब) किंवा भज (क) किंवा भज (ड) या प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

**वेतनश्रेणी:-** रू.१५,६००-३९,१००, ग्रेड पे - रू.७,६००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील.

(एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.५५,२९५/-)

प्रतिनियुक्तीच्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे शेवटचे वेतन संरक्षित केले जाईल. याशिवाय, त्यांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातून विद्युत / पॉवर अभियांत्रिकीमधील पदवी

किंवा

(ब) विद्युत अभियांत्रिकी / विद्युत यंत्रणामधील (पॉवर सिस्टीम) पदव्युत्तर पदवी किंवा एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधून वित्तिय व्यवस्थापन/वीज व्यवस्थापनामध्ये दोन वर्षांचा एमबीए.

किंवा

(क) मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीसह एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधील एमबीए किंवा सनदी लेखापाल.

(ड) विद्युत अभियांत्रिकी / विद्युत यंत्रणामधील पदव्युत्तर पदवी किंवा एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधील एमबीए (वित्तिय व्यवस्थापन/वीज व्यवस्थापन) किंवा सनदी लेखापाल या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.

**अनुभव:-**

(अ) विद्युत क्षेत्र / विद्युत कंपनी / परवानाधारक / नियामक आयोगामध्ये कामाचा किमान ७ वर्षांचा अनुभव;

(ब) इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;

(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.

(ड) निर्मिती, पारेषण, वितरण, नूतनशील ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता आणि आर्थिक विश्लेषण करण्याची योग्यता, प्रतिकृती (मॉडेलिंग) आणि सांख्यिकी तंत्र या कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल.

**वयोमर्यादा (१५.०६.२०११ रोजी):-**

उमेदवाराचे कमाल वय ४० वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही.

८) **पदाचे नाव:- उप संचालक (विधी)**

**मंजूर पद:- ४ (चार) ( २ अराखीव, १ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती,**

**वेतनश्रेणी:-** रू.१५,६००-३९,१००, ग्रेड पे - रू.७,६००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील.

(एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.५५,२९५/-)

प्रतिनियुक्तीच्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे शेवटचे वेतन संरक्षित केले जाईल. याशिवाय, त्यांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**शैक्षणिक अर्हता:-**

मान्यताप्राप्त विद्यापीठ / विधी शाळा (लॉ स्कुल) मधील कायदेविषयक स्नातक पदवी.

**अनुभव:-**

(अ) पदवी प्राप्त केल्यानंतर, कोणत्याही सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील संस्था किंवा सार्वजनिक प्राधिकरण यांच्या विधीविषयक बाबी हाताळताना, न्यायिक/अर्ध-न्यायिक संस्थासारख्या विविध न्यायालयात प्रतिनिधीत्व करण्याचा, किमान ७ वर्षांचा वकिलीचा अनुभव. उमेदवारास ॲडव्होकेट्स अधिनियम, १९६१ मधील व्याख्येनुसार एक ॲडव्होकेट म्हणून न्यायालय/न्यायाधीकरण/मंच, इ. मध्ये वकिली करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक;

(ब) विद्युत क्षेत्र/नियामक आयोगामध्ये किमान २ वर्षांचा कामाचा अनुभव असल्यास अधिक पसंती;

(क) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;

(ड) संगणकविषयक ज्ञान आवश्यक.

**वयोमर्यादा (१५.०६.२०११ रोजी):-**

उमेदवाराचे कमाल वय ४० वर्षाहून अधिक नसावे. प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही.

**इतर अटी** :-

**(१) सेवाशर्ती :-**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांच्या सेवा भरती आणि सेवा शर्ती), २००७ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांच्या सेवा भरती आणि सेवा शर्ती) (सुधारणा), २०११ मधील सेवेच्या अटी व शर्ती आयोगाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना लागू राहतील. हे विनियम आयोगाच्या www.mercindia.org.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(२) निवास व्यवस्था :-**

आयोगाकडून निवास व्यवस्था करण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारास निवासाची सोय स्वत: करावी लागेल.

**(३) अर्ज विहित केलेल्या नमुन्यात साध्या कागदावर सादर करणेबाबत :-**

३.१ अर्ज विहित केलेल्या नमुन्यात साध्या कागदावर सादर करण्यात यावा.

३.२ अर्ज नमुन्याप्रमाणे चांगल्या प्रतीच्या सफेद ए-४ आकाराच्या कागदावर इंग्रजीमध्ये टंकलिखित करण्यात यावा आणि त्यावर अलीकडचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरी करुन चिकटविण्यात यावे.

३.३ अर्जदाराने सर्व रकान्यातील माहिती अचूकपणे भरल्याची तसेच छायाचित्रावर सही केल्याची खात्री करावी.

३.४ पाकिटावर ज्या पदासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या पदाचे नाव लिहावे.

३.५ **एखादा उमेदवार जर एकापेक्षा अधिक पदांसाठी पात्र असेल आणि तो जर अशा अधिक पदांसाठी अर्ज करण्यास इच्छुक असेल तर त्याला अशा प्रत्येक पदासाठी वेगळा अर्ज करावा लागेल आणि आवश्यक शुल्क (लागू असल्यास) भरावे लागेल. एकापेक्षा अधिक पदांसाठी एकच अर्ज सादर केल्यास तो अवैध ठरविण्यात येईल आणि नाकारण्यात येईल.**

३.६ सादर करण्यात आलेल्या अर्जासोबत आवश्यक फी नसेल किंवा अपूर्ण भरलेला असेल किंवा वाचता येण्याजोगा नसेल किंवा विहित नमुन्यात नसेले किंवा फोटोशिवाय असेल किंवा त्यावर स्वाक्षरी केलेली नसेल तर असा अर्ज नाकारण्यात येईल आणि आयोगाकडून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**(४) अर्ज नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत सादर करणे :-**

४.१ शासकीय विभागात/सार्वजनिक उपक्रमात/विद्युत कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तिंनी त्यांचे अर्ज नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत पाठवावेत.

४.२ अर्ज जर नियंत्रण अधिकारी/मालका मार्फत पाठवावयाचा असेल आणि या प्रक्रियेत अर्ज जर आयोगाच्या कार्यालयात शेवटच्या तारखेनंतर प्राप्त झाला तर, असा अर्ज नियंत्रण अधिकारी/मालककाकडे शेवटच्या तारखेपूर्वी जरी सादर करण्यात आला असला तरी तो विचारात घेतला जाणार नाही. अशा प्रकरणी, असा अर्ज 'आगाऊ प्रत' असे अर्जावर नमूद करुन आयोगाकडे वरील पत्त्यावर अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी मिळेल अशा बेताने थेट पाठविण्यात यावा आणि त्याची नियमित प्रत सध्याच्या नियंत्रण अधिकारी/मालकामार्फत पाठविण्यात यावी.

**(५) प्रतिनियुक्ती भत्ता :-**

प्रतिनियुक्ती तत्त्वावरील उमेदवारांना शासनाच्या नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता लागू राहील.

**(६) अर्जासोबत पाठवावयाचे शुल्क (विना परताव्याचे) :-**

**सरळ सेवा प्रवेशासाठी**

अ-राखीव वर्गवारीसाठी - रु. ५००/- फक्त (रुपये पाचशे फक्त), राखीव वर्गवारीसाठी - रु. २५०/- फक्त (रुपये अडीचशे फक्त) शुल्क मुंबई येथे देय असलेल्या 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग' या नावे काढलेल्या डीमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर पाठविण्यात यावे. सदर डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर च्या मागील बाजूवर उमेदवाराने त्याचे नाव आणि पत्ता लिहावा तो अर्जासोबत जोडावा. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही.

**प्रतिनियुक्तसाठी**

प्रतिनियुक्तीवरील व्यक्तिंना अर्जासोबत शुल्क पाठवावे लागणार नाही. तथापि, अर्जदाराने त्याचा अर्ज सध्याच्या कार्यालयामार्फत पाठविणे आवश्यक आहे.

**(७) जातीचे प्रमाणपत्र :-**

अ.जा./अ.ज./वि.जा.(अ)/भटक्या जमाती (ब) / भटक्या जमाती (ड) / इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(८) उन्नत व्यक्ति/गट (क्रिमी लेअर) :-**

उमेदवाराला जर वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले तर त्याने मुलाखतीच्या वेळी उन्नत व्यक्ति/गट (क्रिमी लेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(९) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :-**

अर्जदाराने साध्या कागदावर अर्जाच्या नमुन्यासोबत जोडलेल्या विहित नमुना अ मध्ये याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(१०) शैक्षणिक अर्हता आणि अनुभवाचे प्रमाणपत्र**

उमेदवाराला मुलाखतीसाठी बोलाविण्यात आल्यास त्याला मूळ तसेच साक्षांकित केलेली/स्व-प्रमाणित केलेली सर्व शैक्षणिक आणि अनुभवाची प्रमाणपत्रे किंवा अन्य कोणतेही प्रमाणपत्र किंवा

पात्रतेच्या पुष्ट्यर्थ अन्य कोणतेही प्रमाणपत्र सादर करावे लागेल, तसे न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**(११) शारीरिक पात्रता**

नामनिर्देशनाने निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक ही त्यांनी शारीरिक पात्रतेसंबंधी सादर करावयाच्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आणि आयोगाच्या आवश्यकतांना हरकत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीन राहील.

**(१२) चारित्र्य / पूर्वेतिहासाची तपासणी**

नामनिर्देशनाने निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक चारित्र्य आणि पूर्वेतिहास संबंधी पोलिसांकडून होणाऱ्या तपासणीच्या अधीन राहील.

**(१३) लेखी परीक्षा आणि मुलाखत :-**

आयोग सर्व पदांसाठी लेखी परीक्षा आणि मुलाखत घेऊ शकेल. तांत्रिक व भाषेतील कौशल्याची चाचणी घेण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या लेखी परीक्षा आणि मुलाखतीसाठी उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक राहील. परिक्षा इंग्रजी अथवा मराठी भाषेतून घेण्यात येईल.

**(१४) शिफारस :-**

उमेदवाराच्या निवडीसाठी/भरतीसाठी उमेदवाराच्या वतीने शिफारस करण्यात आल्यास किंवा कोणतेही राजकीय अथवा अन्य बाह्य दडपण आणण्यात आल्यास अशा उमेदवारास भरतीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**(१५) अर्ज प्राप्त होण्यास झालेला विलंब :-**

अर्जदाराकडून पाठविण्यात आलेला अर्ज मार्गस्थ असताना गहाळ झाल्यास किंवा आयोगास प्राप्त होण्यास विलंब झाल्यास त्यास आयोग जबाबदार राहणार नाही.

**(१६) प्रवास भत्ता :-**

लेखी परीक्षा/मुलाखतीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवास भत्ता देय नसेल.

**(१७) अर्ज पोस्टाने/कुरीयरने पाठविणे :-**

अर्ज संपूर्ण तपशीलासह सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्रमांक १, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५, यांचेकडे पोस्टाने किंवा

कुरीयरमार्फत पाठविण्यात यावा. **ई-मेल द्वारे किंवा फॅक्स द्वारे पाठविण्यात आलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.**

**(१८) अर्ज नाकारण्याचा हक्क :-**

आयोग कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

**(१९) अर्ज प्राप्त होण्याची अंतिम तारीख :-**

खाली सही करणाऱ्याकडे विहित नमुन्यात केलेला अर्ज **१ ऑगस्ट, २०११** रोजी संध्याकाळी ५.३० पर्यंत किंवा त्यापूर्वी मिळेल अशा बेताने पाठविण्यात यावा. १ ऑगस्ट, २०११ रोजी संध्याकाळी ५.३० नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

सही/-
(के.एन.खवारे)
सचिव, मविनिआ

मुंबई,

दिनांक: १५ जून, २०११